**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२**

**Email ID- pol4.home@maharashtra.gov.in**

---

**क्रमांक :एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५(भाग-१)/पोल-४,** **दिनांक : २३ सप्टेंबर, २०२२**

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय चर्नी रोड,
मुंबई.

**विषय** :- सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम,२०१९ शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मध्ये सुधारणा करण्यासंबंधी शासन अधिसूचनेची इंग्रजी व मराठी प्रत (दोन प्रतींमध्ये) सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर सुधारणा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ (ब) मध्ये आज दिनांक २३.०९.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात यावी. व त्याच्या प्रत्येकी मराठी व इंग्रजीच्या १०० प्रती शासनास व पोलीस महासंचालक कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात याव्या, ही विनंती.

( शिरीष मोहोड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रमुख मुद्रितशोधक (अ) करिता
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४

## NOTIFICATION

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Dated the 23rd September 2022.

Maharashtra Police Act.

No.MTS-0319/CR-245(Part-1)/Pol-4. - In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) ( Second Amendment) Rules, 2022.
2. In the rule 6 of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, in sub - rule (*2*) in clause (*A*), after sub clause (*d*) , the following sub – clauses shall be added, namely :-

"(*e*) Candidate who apply to the post of Police Constable Driver in the Gadchiroli District, shall require to appear in an additional 100 marks written examination of Gondi and Madiya languages.

"(*f*) Only those candidates who are residing in Gadchiroli District shall be eligible to participate in the Gadchiroli District Police Constable Driver recruitment. The said candidates shall attach the

residential certificate issued by the concerned Tahsildar as per prevailing rules.

(*g*) These candidates shall not be entitled to transfer outside the Gadchiroli District".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

( Shirish Mohod )
Deputy Secretary to the Government.

F:\DO Gosavi Sir\RR\Police Constable Driver Corrigendum Gadchiroli.docx

<u>अधिसूचना</u>

गृह विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक २३ सप्टेंबर २०२२

| महाराष्ट्र पोलीस अधिनियम. |
|---|

क्रमांक एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५(भाग-१)/पोल-४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ख) व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमास, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) (दूसरी सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ च्या नियम ६ च्या उप नियम २ मधील (अ) मधील उपखंड ४ च्या नंतर खालीलप्रमाणे उपखंड समाविष्ट करण्यात येत आहे-

"५. गडचिरोली जिल्हयातील पोलीस शिपाई चालक पदाच्या भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेवारांना अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परिक्षा दयावी लागेल"

६. गडचिरोली जिल्हयामध्ये राहणाऱ्या उमेदवारांनाच गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीमध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबंधित तहसिलदार यांनी दिलेला वास्तव्याचा दाखला (Residential Certificate) जोडणे आवश्यक राहील.

७. असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीपात्र असणार नाहीत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शिरीष मोहोड )
शासनाचे उप सचिव

F:\DO Gosavi Sir\RR\Police Constable Driver Corrigendum Gadchiroli.docx